धुळे व अहमदनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१८ प्रभाग रचना करण्याबाबतचे वेळापत्रक

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१८/प्र.क्र.४२/का.५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२
दिनांक :- २७/०७/२०१८

प्रति,
आयुक्त,
धुळे व अहमदनगर महानगरपालिका

विषय :- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१८
प्रभाग रचना करण्याबाबतचे वेळापत्रक

संदर्भ :- १) सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.९
२) महाराष्ट्र महानगरपालिका(प्रभागामध्ये राखीव जागांचे वाटप करणे व त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०१६, दि.१३/६/२०१६
३) राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २०/८/२०१६ चे आदेश

महोदय,

धुळे व अहमदनगर महानगरपालिकेची मुदत दि.२९ डिसेंबर, २०१८ रोजी संपत असून तिची सार्वत्रिक निवडणूक अधिनियमातील तरतूदीनुसार, तत्पूर्वी घेणे आवश्यक आहे.

२. सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.९ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ मध्ये दुरुस्ती करण्यात आली असून त्यानुसार महानगरपालिकांमध्ये(बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) एकसदस्यीय प्रभाग पध्दतीऐवजी बहुसदस्यीय प्रभाग पध्दती लागू करण्यात आली आहे. महानगरपालिकेची सदस्य संख्या विचारात घेऊन जास्तीत जास्त प्रभाग ४ सदस्यांचे करावयाचे आहेत. सर्व प्रभाग ४ सदस्यांचे होत नसल्यास एक प्रभाग ३ किंवा ५ सदस्यांचा होईल अथवा दोन प्रभाग ३ सदस्यांचे होतील.

तसेच आरक्षण निश्चितीकरीता शासनाने दिनांक १३/६/२०१६ रोजी “महाराष्ट्र महानगरपालिका (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०१६” पारित केले आहेत. त्यानुसार आरक्षित प्रभाग निश्चित करण्याकरीता कार्यवाही करणे आवश्यक आहे.

३.	नागरी क्षेत्रातील प्रभाग रचना करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने यापूर्वीचे आदेश अधिक्रमित करुन संदर्भाधीन क्र.३ च्या आदेशान्वये महानगरपालिकांच्या निवडणुकांकरीता प्रभाग रचना करण्याबाबत आदेश जारी केलेले आहेत. त्यानुसार प्रारुप प्रभाग रचना करणे, सोडत काढणे, प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करणे, हरकती व सूचना मागविणे, सुनावणी देणे व अंतिम अधिसूचना प्रसिध्द करणे, इ. याबाबत कार्यवाही करावयाची आहे. यासंदर्भात कोणतीही शंका असल्यास तात्काळ राज्य निवडणूक आयोगाचे मार्गदर्शन प्राप्त करुन घ्यावे.

४.	धुळे व अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग रचनेबाबतचे वेळापत्रक सोबतच्या सहपत्र-१ मध्ये दर्शविल्यानुसार राहील. सदर वेळापत्रकानुसार प्रत्येक टप्पा वेळेवर व योग्य रितीने पूर्ण करण्याची जबाबदारी महानगरपालिका आयुक्त यांची राहील. यासंदर्भात त्यांनी योग्य ती सर्व उपाययोजना करणे आवश्यक आहे.

५.	सोडतीनुसार आरक्षित झालेल्या जागांचा तपशील, प्रारुप प्रभाग रचना, अंतिम प्रभाग रचना याबाबतची सविस्तर माहिती महानगरपालिकेने वेळोवेळी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित -
विभागीय आयुक्त, नाशिक विभाग
जिल्हाधिकारी, धुळे व अहमदनगर

सहपत्र-१

सार्वत्रिक निवडणूक- २०१८

धुळे व अहमदनगर महानगरपालिका

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/मनपा-२०१८/प्र.क्र.४२/का-५, दि. २७/०७/२०१८ सोबतचे सहपत्र)

प्रभाग रचना, आरक्षण, सोडत व सुनावणी इत्यादिचा कार्यक्रम

| अ.क्र. | टप्पा | कार्यवाही करण्यास सक्षम प्राधिकारी | टप्पा सुरु करण्याचा व पूर्ण करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव(अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरीता आरक्षित प्रभागांसह) तयार करणे. | महानगरपालिका आयुक्त | ०७/०८/२०१८ (मंगळवार) पर्यंत |
| २. | प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव(अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरीता आरक्षित प्रभागांसह) तपासणी करुन राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविणे. | संबंधित विभागीय आयुक्त, महानगरपालिका आयुक्त तसेच संबंधित जिल्हाधिकारी यांची समिती | १३/०८/२०१८ (सोमवार)पर्यंत |
| ३. | प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरीता आरक्षित प्रभागांसह ) मान्यता देणे. | राज्य निवडणूक आयुक्त | १८/०८/२०१८ (शनिवार) पर्यंत |
| ४. | सोडत काढण्यासाठी(नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला इत्यादिकरीता) जाहीर नोटीस प्रसिध्द करणे. | महानगरपालिका आयुक्त | २१/०८/२०१८ (मंगळवार) |
| ५. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला इत्यादिकरीता सोडत काढणे. | महानगरपालिका आयुक्त | २४/०८/२०१८ (शुक्रवार) |
| ६. | प्रारुप प्रभाग रचनेची (सोडतीनंतर) अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करणे. | महानगरपालिका आयुक्त | २७/०८/२०१८ (सोमवार) |
| ७. | प्रारुप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना मागविण्याचा कालावधी | महानगरपालिका आयुक्त | २७/०८/२०१८ (सोमवार) ते ०५/०९/२०१८ (बुधवार) |
| ८. | प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देणे. | राज्य निवडणूक आयुक्त अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी | १५/०९/२०१८ (शनिवार) पर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देणाऱ्या अधिकाऱ्यांनी केलेल्या शिफारशी नमूद करुन त्या राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करणे. | महानगरपालिका आयुक्त | २४/०९/२०१८ (सोमवार)पर्यंत |
| १० | प्रारुप प्रभाग रचेनवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा काळजीपूर्वक विचार करुन निर्णय देणे. | राज्य निवडणूक आयुक्त | २८/०९/२०१८ (शुक्रवार) पर्यंत |
| ११ | सुनावणीनंतर झालेल्या निर्णयानुसार प्रभाग रचनेच्या अधिसूचना व नकाशामध्ये योग्य ते बदल करुन प्रभाग रचनेची अंतिम अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करणे. | महानगरपालिका आयुक्त यांच्यामार्फत | ०१/१०/२०१८ (सोमवार) पर्यंत |

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( नि. ज. वागळे )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र